उप संचालक, नगर रचना (गट-अ) पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती व पदस्थापना...

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक- बिंदुना-६२१७/१०८२/प्र.क्र.१३६/नवि-२७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक:- ०८ मार्च, २०१९.

<u>वाचा</u> : १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग जाहिरात क्र.१५/२०१८

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. ११८३(१)/९९९९/पंधरा, दि.२८.०२.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील उप संचालक, नगर रचना (गट-अ/राजपत्रित) या संवर्गातील रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२७.०६.२०१८ (जा.क्र.१५/२०१८)रोजी दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत प्रक्रियेअंती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२८.०२.२०१९ च्या पत्रान्वये उमेदवारांच्या नांवाची शासनास शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदर उमेदवारांना नियुक्ती व पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयातील उप संचालक, नगर रचना (गट-अ) (राजपत्रित) (वेतनबँड रु. १५६००-३९६००, ग्रेड वेतन रु.७६००) (सातव्या वेतन आयोगानुसार वेतन संरचना एस-२५ : ७८८००-२०९२००) या पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अ.जा.-१, अराखीव महिला-१ अशा विज्ञापित केलेल्या एकूण २ पदांवर खालील नमूद केलेल्या उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे, तसेच या प्रकरणी मा.प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल झालेल्या मुळ अर्ज क्र.५४४/२०१८ यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नियुक्तीसाठी शिफारस केलेली आहे.

अ.क्र.	उमेदवारांचे नांव	मुलाखत क्र.	वर्गवारी	शेरा
१.	श्री.राजेंद्र महादेव पवार	८	खुला	OPEN(F) against-१
२.	श्री.हर्षल चंद्रकांत बाविस्कर	२	अ.जा.	SC(General)-१

०२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची शिफारस तसेच त्यानुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात आलेला अहवाल विचारात घेऊन श्री. राजेंद्र महादेव पवार व श्री.हर्षल चंद्रकांत बावीस्कर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून

सरळसेवेने उपसंचालक, नगर रचना उप संचालक, नगर रचना (गट-अ) (राजपत्रित) (वेतन संरचना एस-२५ : ७८८००-२०९२००) या पदावर खालील अटी/ शर्तीवर या आदेशाद्वारे नियुक्ती देण्यात येत असून त्यांची सरळसेवेने उप संचालक, नगर रचना या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

०३. अटी व शर्ती:-

अ) श्री.रा.म.पवार व श्री.ह.चं.बाविस्कर यांची उपसंचालक, नगर रचना या पदावरील उक्त नियुक्ती प्रथम २ वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीसाठी राहील.

ब) श्री.रा.म.पवार व श्री.ह.चं.बाविस्कर यांची उपसंचालक, नगर रचना या पदावरील उक्त नियुक्ती या प्रकरणी मा.प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई येथे दाखल झालेल्या मूळ अर्ज क्र.५४४/२०१८ मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

क) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/ कार्या.१२, दि.२८ मे, २०१८ मध्ये नमूद केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ च्या नियम ४(२)(अ) मधील तरतूदीनुसार श्री.रा.म.पवार व श्री.ह.चं.बाविस्कर यांनी सदर नियुक्ती या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत स्विकारणे बंधनकारक राहील. सदर विहित कालावधीत ते रुजू झाले नाहीत तर ते नोकरीची संधी गमावतील व त्यांचा नियुक्तीकरिता विचार करण्यात येणार नाही. यासाठी संबंधित उमेदवाराकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही कारणांचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही.

ड) श्री.रा.म.पवार व श्री.ह.चं.बाविस्कर यांचा शासन सेवेत वैद्यकीय तपासणी व पोलीस अहवाल यापुर्वीच घेतला असल्यास नव्याने तपासणी तसेच पोलीस अहवाल घेणे आवश्यक राहणार नाही. अन्यथा असा अहवाल आवश्यक राहील.

इ) श्री.रा.म.पवार व श्री.ह.चं.बाविस्कर यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार संगणक हाताळणी वापराबाबतचे आवश्यक प्रमाणपत्र सादर केले नसल्यास एका महिन्याच्या कालावधीत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र पुणे यांच्याकडे सादर करावे.

ई) उक्त उमेदवारांची नियुक्ती ही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले वैध जात प्रमाणपत्र, गोपनीय अहवाल, संगणक हाताळणीबाबत/वापराबाबतचे आवश्यक ते प्रमाणपत्र, विहीत साक्षांकन नमुन्यातील माहिती व शैक्षणिक अर्हता इ. आवश्यक प्रमाणपत्रांची सत्यासत्यता तपासण्याच्या तसेच संबंधित उमेदवार सदर पदावरील नियुक्तीच्या पात्रतेच्या विहीत अटींची पूर्तता करतात ही बाब तपासण्याच्या अधिनतेने राहील.

फ) सदर उमेदवार हे सदर पदावरील नियुक्तीच्या पात्रतेच्या विहीत अटींची पूर्तता करतात याबाबतची पडताळणी तसेच संबंधित उमेदवारांच्या जात प्रमाणपत्र, जात पडताळणी

प्रमाणपत्र व शैक्षणिक प्रमाणपत्रांची विहीत प्राधिकरणांकडून तपासणी करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही संचालक, नगररचना, पुणे यांनी करावी.

०४. उपरोक्त अधिकाऱ्यांना उप संचालक, नगररचना या पदावर पुढीलप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे :-

अ.क्र.	**नांव**	**पदस्थापनेचे पद व कार्यालय**
१.	श्री.रा.म.पवार	उप संचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे (शा.आ.)
२.	श्री.ह.चं.बाविस्कर	उप संचालक, नगररचना, नाशिक महानगरपालिका, नाशिक (प्र.नि.)

०५. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी श्री.रा.म.पवार यांना नवीन पदावर रुजू होण्यासाठी ते सध्या धारण करीत असलेल्या पदावरुन कार्यमुक्त करण्याबाबतचे व नवीन पदाचा कार्यभार स्विकारण्याबाबतचे कार्यकारी आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

०६. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी श्री.बाविस्कर यांनी नियुक्तीच्या पदावर रुजू होण्यासाठी संचालक, नगररचना, पुणे यांच्याशी संपर्क साधावा. संचालक, नगररचना यांनी श्री.बाविस्कर हे रुजू झाल्यानंतर उक्त पदाचा कार्यभार स्विकारण्याबाबतचे कार्यकारी आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक क्र.**२०१९०३०८१६४०२१२५२५** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2019.03.11 15:58:44 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा परिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.

६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. (पत्राने).
७. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मा.राज्यमंत्री नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, यांचे स्वीय सहायक.
९. मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग (१) स्वीय सहायक.
१०.मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) स्वीय सहायक.
११.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२.आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
१३.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे
१४.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
१५.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६.जिल्हाधिकारी, पुणे/नाशिक
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/नाशिक.
१८. सर्व सहसंचालक, नगररचना----------------
१९.उप सचिव (नवि-३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२०.सर्व उप संचालक, नगर रचना ------------------
२१.श्री.रा.म.पवार, अवर सचिव, नगर विकास विभाग (संचालक, नगर रचना, पुणे यांच्यामार्फत).
२२.श्री.ह.चं.बाविस्कर, रा.एफ टाईप ओनर्स असोसिएशन, सेक्टर-७, वाशी, नवी मुंबई-४००७०३.
२३.निवडनस्ती/नवि-२७.